# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१

E-mail : desk4@dtemaharashtra.gov.in Web : www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक : ४/आस्था/मत्तावदायित्व/२०१७/ १४६

दिनांक : - 7 APR 2017

प्रति,

१) संचालक, म.रा., तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई

२) सहसंचालक,
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालये,
मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर

**विषय :** मत्ता व दायित्वे यांची वार्षिक विवरणपत्रे सादर करणेबाबत....

**संदर्भ :** शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्र. वशिअ-१२१४/प्रक्र२६/११, दिनांक २ जून, २०१४

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सामान्य प्रशासन विभागाचा संदर्भाधिन दिनांक २ जून, २०१४ रोजीचा शासन निर्णय कृपया पहावा.

शासकीय सेवेतील गट-अ व गट-ब मधील सर्व अधिकारी तसेच गट-क मधील कर्मचाऱ्यांची मत्ता व दायित्वे यांची वार्षिक विवरणपत्रे सादर करण्याबाबत असलेले पूर्वीचे आदेश शासनाने अधिक्रमित करुन यासंदर्भात करावयाच्या आवश्यक कार्यवाहीचे निर्देश सदर संदर्भाधिन शासन निर्णयान्वये शासनाने दिलेले आहेत. तसेच सदरची विवरणपत्रे सादर करण्याकरिता वेळापत्रकसुध्दा देण्यांत आलेले आहे.

प्रत्येक शासकीय कर्मचा-याने (गट ड मधील कर्मचारी वगळता) संदर्भिय शासन निर्णयासोबत जोडलेल्या प्रपत्र-१, प्रपत्र-२ व प्रपत्र-३ मध्ये त्याच्या मालमत्तेचे विवरण प्रत्येक वर्षी सादर करावयाचे असून, प्रत्येक वर्षी त्या-त्या वर्षाच्या ३१ मे पर्यंत सादर करावयाचे आहे.

गट-अ व गट-ब च्या अधिकाऱ्यांच्या बाबतीत अशी विवरणपत्रे दरवर्षी विवरणपत्र सादर करण्याच्या वेळीस ते ज्या कार्यालयात कार्यरत असतील त्या कार्यालयाच्या प्रमुखांव्दारे सहसंचालकांना सादर करावीत व सहसंचालकांनी ती संस्थानिहाय एकत्रित करुन दरवर्षी ३० एप्रिल पर्यंत संचानलनालयास सादर करण्यांत यावीत.

संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांनी ही विवरणपत्रे सीलबंद लिफाफ्यात सादर करावीत. तसेच ही विवरणपत्रे प्राप्त झाल्यानंतर संदर्भिय शासन निर्णयात अ.क्र. २ (i)(ii)(iii) मध्ये नमूद केलेल्या विहीत प्राधिकाऱ्यांनी ती स्वत:च्या ताब्यात ठेवावयाची आहेत. तसेच त्यांनुसार प्राप्त झालेल्या विवरणांचा अहवालसुध्दा सादर करावयाचा आहे.

सदर आदेशातील परिच्छेद ४ नुसार पुढीलप्रमाणे निर्देश देण्यांत आलेले आहेत.

अ) या आदेशाप्रमाणे कोणतेही विवरण विहीत कालावधीत सादर न केल्यास ती गैरवर्तणूक मानण्यांत येईल व अशा गैरवर्तणूकीबद्दल महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ च्या तरतूदीनुसार शिस्तभंगविषय कारवाई करण्यांत येईल.

ब) अशा प्रकारची त्या-त्या वर्षाची वार्षिक मालमत्ता विवरणपत्रे सादर केली असणे ही राज्य शासनामधील सर्व टप्प्यांवरील पदोन्नती, आश्वासित प्रगती योजनेंतर्गतच्या पदोन्नती, प्रतिनियुक्ती, विदेश दौरा यासाठी पूर्वअट म्हणून विहीत करण्यांत आलेले आहे. परिणामी कोणत्याही अधिकारी/कर्मचाऱ्यास आश्वासित व नियमित पदोन्नतीचा लाभ देण्यापूर्वी किंवा प्रतिनियुक्तीस अनुमती देण्यापूर्वी तसेच कार्यालयीन विदेश दौऱ्यास अनुमती देण्यापूर्वी त्याने त्या वर्षाचे ३१ मार्च रोजीचे मालमत्ता विवरणपत्र सादर केले नसल्यास त्यांना पदोन्नती / आश्वासित प्रगती योजनेतील पदोन्नती देण्यांत येऊ नये. व अशी विवरणपत्रे सादर केल्यानंतरच त्यांना पदोन्नती दिली जाईल याची दक्षता घ्यावी. तसेच असे विवरणत्र सादर केले नसेल तर त्यास प्रतिनियुक्ती किंवा विदेश दौऱ्यास अनुमती देण्यांत येऊ नये.

तरी, सर्व सहसंचालकांना कळविण्यांत येते की, उपरोक्त अ व ब येथील तरतूदी विचारात घेऊन यापुढे पदोन्नती / पदोन्नतीस मुदतवाढ / आश्वासित योजेंतर्गत पदोन्नती / प्रतिनियुक्ती / परदेश दौरा याबाबतचे प्रस्ताव या कार्यालयास सादर करतेवेळी प्रस्तावातील संबंधित अधिकारी / कर्मचाऱ्यांकडून विहीत कालावधीत आवश्यक ती विवरणपत्रे सादर करण्यांत आले आहेत किंवा कसे याबाबतचा तपशीलही देण्यांत यावा. तसेच संदर्भाधिन शासन निर्णयातील तरतूदींचे काटेकोरपणे पालन करुन आपल्या अधिपत्याखालील पदवी तसेच पदविका संस्था/कार्यालयातील गट अ व गट-ब मधील सर्व अधिकाऱ्यांचे मत्ता व दायित्वे याबाबतची वार्षिक विवरणपत्रे या कार्यालयास शासनास सादर करण्यासाठी दिनांक ३० एप्रिल २०१७ पर्यंत संस्था/कार्यालय निहाय एकत्रित करुन सादर करावीत. सदरची विवरणपत्रे संचालनालयास सादर करताना प्रशासकीय संवर्गातील व पदवी संस्थांमधील गट अ मधील अध्यापक तसेच गट-ब च्या पदावर कार्यरत अधिकाऱ्यांची विवरणपत्रे कार्यासन क्रमांक ४ ला तसेच पदविका संस्थांमधील गट-अ च्या अध्यापकांची विवरणपत्रे कार्यासन क्रमांक ४अ ला स्वतंत्र पत्राव्दारे पाठविण्यांत यावीत.

तसेच आपल्या अधिपत्याखालील गट क च्या कर्मचाऱ्यांबाबत संदर्भिय शासन निर्णयातील तरतुदीनुसार योग्य वेळी कार्यवाही करावी. शासन निर्णय व त्यासोबतचे विवरणपत्र आपल्या विभागातील कार्यालये/संस्थांमधील सर्व नियमित गट-अ, ब व क च्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना त्यांचे कार्यालय प्रमुख / संस्था प्रमुख यांचेमार्फत निदर्शनास आणून देणेबाबतची कार्यवाही करुन त्यांचेकडून पोच घेण्यांत यावी.

(चंद्रशेखर ओक) भा.प्र.से.
संचालक, तंत्र शिक्षण,
म.रा. मुंबई

**तात्काळ/कालमर्यादित**

पृष्ठांकन क्र.विकाऔ/आस्था-१/२०१७-१८/१३८८
दि. 18 APR 2017

प्रति,
**प्राचार्य**,
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय,औरंगाबाद.
शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय,औरंगाबाद.
**प्राचार्य**,शासकीय तंत्रनिकेतन,
औरंगाबाद/जालना/अंबड/जिंतूर/हिंगोली/नांदेड/बीड/उस्मानाबाद/पु.ला.शा.तं.लातूर/शा.नि.म.तं.लि.लातूर
**उपसचिव**,महराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,प्रादेशिक कार्यालय,औरंगाबाद.

मा संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय,मुंबई यांच्या उपरोक्त पत्रातील निर्देशानुसार कार्यवाही करुन **गट अ व ब** अधिकाऱ्यांची मत्ता व दायित्वे वार्षिक विवरणपत्रे या कार्यालयास दि.२४/०४/२०१७ पर्यंत सादर करण्यात यावी.

प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद.

**प्रत**:-या कार्यालयाच्या प्रोग्रामर यांना संकेतस्थळावर अपलोड करण्यास्तव.

Indorsment